International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

**Original Article**

# मध्ययुगीन मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थिती

**प्रा. डॉ. अभय पाटील.**

*इतिहास विभाग, स. गा. म. कॉलेज, कराड*

**Manuscript ID:** IJAAR-130210

**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 2**
**November - December 2025**
**Pp. 52 - 56**

**Submitted:** 10 Dec 2025
**Revised:** 20 Dec 2025
**Accepted:** 25 Dec 2025
**Published:** 1 Jan 2026

***Corresponding Author:***
*प्रा. डॉ. अभय पाटील.*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.18139011

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.18139011

Creative Commons

OPEN ACCESS

**प्रस्तवाना:**

मध्ययुगापासुन भारतात चालत आलेली प्रांतो-प्रांती, गावो गावची जशी समाज -रचना तशीच समाज रचना पध्दती मराठी मुलखात मध्यकालखंडात ठेवलेली दिसते. गावोगावची ही मूळची समाज रचना जातीय पध्दतीवर कायम स्वरूपी केलेली आहे. या समाज रचनेला धर्मशास्त्रे, स्मृतीग्रंथ यांचा आधार होता. ते स्पष्ट दिसते. म्हणूनच गावोगावी जाती-जातीची वस्तीस्थाने, जाती-पातींच्या वाडा, आळी, गल्लीनें पक्क्या व कायम स्वरूपात विभागुण ठेवलेली दिसतात. ही जाती-जातींची वस्तीस्थाने योजनाबध्द पध्दतीने वसवलेली दिसतात. मध्ययुगात मराठा कालखंडात मराठी मुलखात गावोगावी अशीच जातींच्या गुण वैशिष्टेयावर उच्च, नीचतेवर वेगवेगळी वस्तीस्थाने वसवलेली दिसतात.

गावोगावी अशा जातींच्या उच्च नीचतेवर वसलेल्या समाजरचनेचा गावच्या सामाजीक, परिस्थितीवर परिणाम होतो. तसा परिणाम मध्ययुगात मराठा कालखंडातील सामाजीक परिस्थितीवर झालेला आहे.

**एका गावात अनेक गावे :**

मराठा कालखंडात जातीय पध्दतीवर आधारलेल्या समाजरचनेचा परिणाम गावोगावी झालेला आहे. तो असा की एका गावात दोन किंवा अधिक गावे त्यामुळे दिसतात. गावात गाववेशीच्या बाहेर अस्पृष्य, अतिशुद्र, म्हणुन मानलेल्या जातीचीं वस्ती असते. ही वस्ती गावाच्या पुर्व आणि दक्षिण दिशानां बहुतेक करून असते. ही अस्पृष्य व अतिशुद्रांची वस्ती गावा बाहेर असल्याने ते एक स्वंतत्र गावच वाटते. गावच्या आत सवर्णाची वस्ती असते, त्यात चातुवर्ण प्रणित सर्वाची वस्ती स्थाने आढळतात. अशी अनेक कालखंडात, शतकानुशतके, पिढयान पिढयापासुन वस्ती स्थाने आढळतात. म्हणुन ती एका गावात अनेक गावे आपणास असल्याची दिसतात.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*प्रा. डॉ. अभय पाटील. (2025). मध्ययुगीन मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थिती. International Journal of Advance and Applied Research, 13(2), 52 –56.* https://doi.org/10.5281/zenodo.18139011

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
*Volume-13, Issue-2 | November - December 2025*

मध्यकाळात गावच्या वस्तीस्थानाचे असे वास्तव रूप होते. इतकेच काय पण आजही मराठी भाषीक प्रदेशात असेच उघडे वास्तव दृश्य दिसते. एका गावात अशी सवर्ण, अस्पृष्य, शुद्रादिशुद्रांची वेगवेगळी कायमस्वरूपी वस्तीस्थाने आढळतात.[1]

गावच्या आतील भागात सवर्ण जाती मधील इतर जातीची वेगवेगळी वस्ती वसलेली असे. ही वेगवेगळया जातीची घरे गावातल्या गल्ली-बोळाने कायमस्वरूपी विभागलेली असत. या जाती वंश परंपरागत तेथे कायम रहात असत. प्रत्येक जातीची वेगळी गल्ली अथवा आळी असे. आपली गल्ली सोडून दुसऱ्या आळीत, गल्लीत घर करून रहाता येत नव्हते. असे रूढी परंपरेचे बंधन असे. याच रूढी बंधनामुळे गावतटाच्या बाहेर राहण्यारे अस्पृष्य, शुद्रादिशुद्र यांना गावतटाच्या आत राहता येत नव्हते. वस्ती करता येत नव्हती. घर करून राहू देत नसत. हीच परिस्थिती मध्यकाळात मराठा कालखंडात होती. आजही ग्रामीण भागातील खेडेगावात असेच वास्तव आहे.

पेशवे काळात "महार, मांग, चांभार आदी अस्पृश्य मानले जात असत. हे समाजात सामाजिक ,आर्थीकदृष्ट्या कनिष्ठ, व खालच्या दर्जाचे मानले जात. त्यांना गावात राहाण्याची परवानगी नव्हती. त्याची घरे, वस्तीस्थाने गावतटाबाहेर वसवलेली असत."[2]

गावचा तट, गावकुसाच्या आत अस्पश्यानां आपली वस्ती, घरे करण्यास परवानगी नसे. त्यांच्यावर धर्मशास्त्रे, स्मृती ग्रंथाची बंधने होती. तत्कालीन गावकुस, तट नैसर्गिक आपत्तीत पाऊस, वादळे यामुळे पडल्यास अथवा पुराने वाहुन गेल्यास तट दुरूस्ती करावी लागे. तेव्हा सत्ताधिकारी अस्पृष्य व अतिशुद्रांच्या येथील वस्त्या, घरे हलवित असत. पेशवे रोजनिशी खंड क्रं. 8 नोंद. 1142 अशी सापडते. "मौजे कात्रज ऊर्फ कार्यात मावळ येथे गावालगतची महार मांग व चाभांर यांची घरे होती ती मोडून दुसऱ्या ठिकाणी घातली याचा मोबदला 207 महार, 14 मांग, 30 चाभांर अशा 251 लोकांना मोबदला दिल्याची नोंद आढळते." ( प्रत्येकी रू. 251 × 22 एकूण 5522)[3]

'कांही प्रसंगी व्यापार-उदिम करणाऱ्या लोकांसाठी बाजारपेठा वसविण्यासाठी गावा बाहेरील वस्ती उठवावी लागे त्यात पहिले बळी महार, मांग आदि असत.'[4] या संदर्भातील कांही पत्रे पुरंदरे दप्तरात मिळतात. मध्ययुगात मराठा काळात गावच्या अस्पृष्य समाजाची वस्ती गावच्या तटा बाहेर असे. युध्दे व नैसर्गिक आपत्तीत अथवा गावकारणांकरिता उठवली, तरी त्यांना गाव तटाच्या आत कोणत्याही परिस्थितीत वस्ती करू दिली जात नव्हती. त्याची वस्ती गावच्या बाहेर वेगळी अलग अशीच वसवली जात असे.

**वेगवेगळे पाणवठे:**

या कालखंडात गावो गावी नदीवर किंवा ओढयावर गावातील सर्व जातीचे पाणवठे असत. त्याचा अनुक्रमही जातीनुसार लावलेला असे. जातीच्या दर्जानुसार सदर पाणवठे वर, खाली असत. ब्राह्मण, मराठा, वाणी, उदम्यांचे पाणवठे नदी, ओढयाच्या धारेत वरील बाजुस असत. त्यात ब्राह्मणांचा पाणवठा सर्वाच्या वर असे. त्याच्या खाली

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

मराठा व इतर जातीचे असत. खालील बाजुस आलुतेदार बलुतेदार आणि अस्पृष्य जातीचे पाणवठे येत असत. मध्यकालखंडात हे पाणवठे क्षेष्ठ, कनिष्ठ श्रेणीप्रमाणे असत. "अतिशुद्राचे पाणवठे एकदम खालच्या बाजुला असत. पेश्वाईत 18 व्या शतकात प्रत्येक जातीचे वेगवेगळे पाणवठे, पाणपोई, हैद, असत."[5]

पेशवाईत पुणे शहरात अनेक हौद होते. नागझरा-अतिशुद्राचा, सदाशिव-सवर्ण, बाहुली - वाणी, इ. दिवे घाटात उच्चवर्णियांची एक पाणपोई होती. तेथे रखवालदार रामोशी असे त्याची सावली पाणपोईवर पडू नये म्हणुन त्यास वीस हातावर उभे राहुन पहारा द्यावा असा आदेश पेशव्यांनी दिला होता.[6] अस्पृष्य जातीतील कोणत्याही पुरूष अगर स्त्रीला सवर्ण पाणवठयावर पाणी भरता येत नव्हते. अथवा त्या पाणवठयाला स्पर्श करता येत नसे. अशी परंपरागत चालरित अनेक वर्ष मध्य कालखंडात चालत आली होती. त्यामुंळे खेडयापाडयात पाणवठयाच्या जागा जातीप्रमाणेच पक्क्या केलेल्या असत त्यास रूढी, परंपरा, धर्मशास्त्र, पुराणग्रंथ इ. चा आधार घेतला जाई.[6]

भारतात जातीय पध्दतीवर आधारलेल्या या समाजरचनेत जात, जातीयता, व अस्पृष्यता ही किती घट्ट स्थिरावलेली आहे याची आपणास कल्पना येते. व ती येथील मानवाच्या मनात घर करून बसलेली आहे.

**वेगवेगळ्या स्मशान जागा:**

मनुस्मृती, व इतर धर्मशास्त्र ग्रंथानी प्रत्येक समाज रूढीबध्द परंपरेत बांधला. त्यामुळे प्रत्येक जातीच्या वेगवेगळ्या स्मृशान जागा निर्माण झाल्या. मानव मृत पावला तरी त्यास जात सोडत नसे. त्यास आपल्या जातीच्या स्मृशान भूमीत दहनविधी करावा लागे. त्यामुळे जात स्मृशान जागेत पक्की झाली. ही परिस्थिती मध्य कालखंडात होती.

**गावगाडा अर्थात बलुते पध्दती:**

बलुते पध्दतीचा जन्म उघोग-व्यवसायातुन जाती स्थिर झाल्यावर झाला. जाती-जातीमध्ये कामाची विभागणी झाली. कामाचा धंदा झाला. त्यातुन 'बलुते' पध्दतीचा जन्म झाला. नऊव्या शतकाच्या उत्तरार्धात बलुते पध्दती सुरू झाली. व ती जात, जन्म यावर आधारली गेली. आणि तोच गावगाडा बनला. त्याची रचना स्वंयपुर्ण होती. हा गावगाडा मराठा काळापर्यत गावच्या कारभाराचा केंद्रबिदू होता. गावातील सर्व आर्थीक, सामाजीक व्यवहार गावगाडया मार्फत चालत. मराठा काळात वंशपरंपरागत वतनदार, मिरासदार, बलुतेदार, व अलुतेदार असत. या शिवाय पै-पाहुणे, दत्तक म्हणुन आलेले व गावात कायमची वस्ती करून राहिलेले 'उपरे' असत.

गावचा प्रमुख हा पाटील असे. त्यास सहकारी म्हणुन कुलकर्णी, चौगुला, व महार वतनदार, रामोशी वतनदार असत. या गावकामगार प्रमुखा शिवाय कुठे, कुठे देशमुख व देशपांडे हे मराठा काळातील परगणा सुभेदार असत. मराठा कालखंडात

गावगाडयाची सत्ता विभागलेली असे. त्यात सरकारचे गाव पातळीवरील अधिकारी 'दिवाण सत्ता', गावच्या जात पंचायतीची 'गोत सत्ता' धर्म संबंधातील 'धर्म सत्ता' अशी ही गाव सत्ता विभागलेली असे. या शिवाय व्यापारी सत्ता ही उघोग, व्यवसाय, व व्यापारावर नियंत्रण व संचलन करीत. अशा या चार गाव सत्ता मध्ये गावातील व्यवहार गाव चावडीत परंपरेनुसार चालत असे. यालाच 'गावगाडा', म्हणत असत.[7] हा गावगाडा प्रत्येक खेडयात, गावात, कसब्यात, वाडी, पाडी व वस्तीवर असे. या गावगाडयात सवर्ण आणि उच्च जातीनां महत्वपूर्ण कामे व अधिकार मिळत. अस्पृष्य व तत्सम जातीनां हलकी व कमी दर्जाची कामे मिळत. या गावगाडयातील कामाच्या विभागणीवर जातींच्या श्रेष्ठ-कनिष्ठ याचा जबरदस्त पगडा होता.

**सारांश:**

मध्ययुगापासुन भारतात चालत आलेली प्रांतो -प्रांती, गावो गावची जशी समाज -रचना तशीच समाज रचना पध्दती मध्यकाळात मराठी मुलखात मराठा कालखंडात ठेवलेली दिसते. गावोगावची ही मूळची समाज रचना जातीय पध्दतीवर कायम स्वरूपी केलेली आहे. या समाज रचनेला धर्मशास्त्रे, स्मृतीग्रंथ यांचा आधार होता. ते स्पष्ट दिसते. म्हणूनच गावोगावी जाती-जातीची वस्तीस्थाने, जाती-पातींच्या वाडा, आळी गल्लीनें पक्क्या व कायमस्वरूपात विभागुण ठेवलेली दिसतात. ही जाती-जातींची वस्तीस्थाने योजनाबध्द पध्दतीने वसवलेली दिसतात. मराठा कालखंडात मराठी मुलखात गावोगावी अशीच जातींच्या गुण वैशिष्टेयावर उच्च, नीचतेवर वेगवेगळी वस्तीस्थाने वसवलेली दिसतात.

मराठा कालखंडात गावो गावी नदीवर किंवा ओढयावर गावातील सर्व जातीचे पाणवठे असत. त्याचा अनुक्रमही जातीनुसार लावलेला असे. जातीच्या दर्जानुसार सदर पाणवठे वर, खाली असत. ब्राह्मण, मराठा, वाणी, उदम्यांचे पाणवठे नदी, ओढयाच्या धारेत वरील बाजुस असत. त्यात ब्राह्मणांचा पाणवठा सर्वाच्या वर असे. त्याच्या खाली मराठा व इतर जातीचे असत. खालील बाजुस आलुतेदार बलुतेदार आणि अस्पृष्य जातीचे पाणवठे येत असत. मराठा कालखंडात हे पाणवठे श्रेष्ठ, कनिष्ठ श्रेणीप्रमाणे असत. "अतिशुद्राचे पाणवठे एकदम खालच्या बाजुला असत. पेशवाईत 18 व्या शतकात प्रत्येक जातीचे वेगवेगळे पाणवठे, पाणपोई, हैद, असत."

बलुते पध्दतीचा जन्म उघोग-व्यवसायातुन जाती स्थिर झाल्यावर झाला. जाती-जातीमध्ये कामाची विभागणी झाली. कामाचा धंदा झाला. त्यातुन 'बलुते' पध्दतीचा जन्म झाला. नऊव्या शतकाच्या उत्तरार्धात बलुते पध्दती सुरू झाली. व ती जात, जन्म यावर आधारली गेली. आणि तोच गावगाडा बनला. त्याची रचना स्वंयपुर्ण होती. हा गावगाडा मराठा काळापर्यत गावच्या कारभाराचा केंद्रबिदू होता. गावातील सर्व आर्थीक ,सामाजीक व्यवहार गावगाडया मार्फत चालत. आज मराठी प्रदेशात खेडेगावातील बलुतेदारीवर आधारलेली अर्थव्यवस्था, जातीव्यवस्था, व्यवसाय पध्दती कायद्याने नष्ट झालेली आहे. बलुता पध्दतीने आधार

दिलेल्या समाजातील वेगवेगळया जाती जमातींचे त्याच्यातील सामाजिक श्रेष्ठ कनिश्टत्वांचे अस्तित्व आपणास आजही ग्रामीण भागात दिसते.

**संदर्भग्रंथ:**


1. Ambadkar Dr.B.R.`Annihilation of cast` page no.21&22
2. पेशवे रोजनिशी ‘खंड’ नं, 8 नोंदः 1142.
3. कित्ता नोंदः 1142
4. पुरंदरे कृ. वा. दप्तर, खंड. 3 लेख : 138
5. भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक वर्ा.32’ अंक 114 पान. नं. 124, 125.
6. पेशवे दप्तर खंड : 7 पान. नं. 19
7. ऐतिहासिक कागदपत्रे लेखनमाला :2730 पीएसएपी नं.26.गावंगाडा.